आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
०८ मे २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पाकिस्ताननं यापुढं कोणतीही आगळीक केली तर त्यावर सडेतोड उत्तर दिलं जाईल, असा भारताचा स्पष्ट इशारा /भारतीय संरक्षण दलानं केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानची लाहोर इथली संरक्षण प्रणाली नष्ट
- सर्वपक्षीय बैठकीत ऑपरेशन सिंदूरचं एकमुखी समर्थन
- महाराष्ट्राचं आर्थिक आरोग्य उत्तम असून वित्तीय तूटही कमी असल्याचा वित्त आयोगाचा निर्वाळा

**आणि**

- तेलंगणात माओवाद्यांनी घडवलेल्या भूसुरुंग स्फोटात ग्रेहाऊंड पोलीस दलाचे तीन जवान शहीद

**<><><><><>**

पाकिस्ताननं यापुढं केलेली कोणतीही आगळीक केवळ परिस्थिती चिघळवणारी असेल, आणि त्यावर सडेतोड उत्तर दिलं जाईल, असा स्पष्ट इशारा भारतानं दिला आहे.

सध्या पाकिस्तानबाबत सुरू असलेली परिस्थिती आणखी चिघळवण्याचा भारताचा हेतू नाही, मात्र लष्करी हल्ले झाले तर त्याला चोख प्रत्युत्तर दिलं जाईल, असं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज नवी दिल्लीत भारत-इराण संयुक्त आयोगाच्या विसाव्या बैठकीत बोलताना सांगितलं.

आज संध्याकाळी नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विक्रम मिस्त्री यांनी सांगितलं की, जागतिक दहशतवादाचं केंद्र म्हणून पाकिस्तानची प्रतिमा जगभरातल्या विविध दहशतवादी हल्ल्यांमध्ये दिसून आली आहे. ओसामा बिन लादेन पाकिस्तानात सापडला होता, याकडे निर्देश करुन ते म्हणाले की,

पाकिस्तानमध्ये लश्कर ए तैयबा, जैश ए मोहम्मद सारख्या संयुक्त राष्ट्रांनी सूचीबद्ध केलेल्या दहशतवादी गटांना मोठ्या प्रमाणात आश्रय आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्काराचं चित्रही त्यांनी दाखवलं. काल पाकिस्ताननं जम्मू-काश्मीरमधल्या शीख समुदायालार लक्ष्य केलं, पूंछमधे गुरुद्वारावर हल्ला केला आणि शीख समुदायाच्या सदस्यांना मारहाण केली, असं त्यांनी सांगितलं. सिंधू पाणी कराराबाबत मिस्री म्हणाले की, पाकिस्तान गेल्या काही वर्षांपासून जाणूनबुजून अडथळे निर्माण करत आहे.

पाकिस्ताननं ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून उत्तर आणि पश्चिम भारतातल्या अनेक लष्करी भागांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र भारताच्या हवाई संरक्षण प्रणालींनी हे प्रयत्न हाणून पाडले, अशी माहिती कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी यावेळी दिली.

<><><><><>

भारतीय संरक्षण दलानं आज सकाळी पाकिस्तानच्या हवाई संरक्षण प्रणालीवर हल्ला केला. यात लाहोर इथली संरक्षण प्रणाली नष्ट झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. भारत पाकिस्तानला जशास तसं उत्तर देत आहे, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

पाकिस्ताननं भारतातल्या श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, जलंधर, लुधियाना, भटिंडा, चंडीगड, भुज या भागात काल रात्री क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले. हे हल्ले भारताच्या हवाई दलानं परतवून लावले. पाकिस्तानं नियंत्रण रेषेवर पूँछ, बारामुल्ला, कुपवाडा या भागात हल्ले वाढवले आहेत. पाकिस्तानी गोळीबारात तीन महिला आणि पाच बालकांसह सोळा जणांचा मृत्यू झाल्याचं संऱक्षण मंत्रालयानं कळवलं आहे. पाकिस्तानी हल्ल्यांना भारत चोख प्रत्युत्तर देत आहे.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्ली इथं संसद भवनात सर्वपक्षीय नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, शिवसेना नेते श्रीकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्यासह समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, द्रविड मुनेत्र कळघम, संयुक्त जनता दल आदी पक्षांचे नेते या बैठकीला उपस्थित होते.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी यावेळी ऑपरेशन सिंदुरमागची भारताची भूमिका स्पष्ट केली. दहशतवादाविरोधातल्या लढाईत सर्व राजकीय पक्ष सरकारसोबत असल्याची ग्वाही उपस्थित नेत्यांनी बैठकीत दिली.

या बैठकीत सर्व पक्षांनी भारतीय सैन्याचं अभिनंदन करून या कारवाईचं एकमतानं समर्थन केलं, असं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू म्हणाले. अशा कठीण परिस्थितीत आपण सर्वजण सरकारसोबत असल्याचं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यावेळी म्हणाले…

**होल्ड… बाईट - मल्लिकार्जुन खरगे…**

**<><><><><>**

राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज विविध विभाग आणि मंत्रालयाच्या सचिवांची उच्चस्तरीय बैठक झाली. विविध मंत्रालयं आणि विभागांच्या सचिवांनी आपापल्या विभागाचा आढावा घ्यावा, तसंच आवश्यक यंत्रणांचं कामकाज व्यवस्थित पार पडेल हे सुनिश्चित करावं असे निर्देश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या बैठकीत दिले. सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवावा आणि सतर्क राहावं असं प्रधानमंत्री म्हणाले.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी सरकार वचनबद्ध आहे, याचा पुनरुच्चार प्रधानमंत्र्यांनी यावेळी केला.

देशातल्या सद्याच्या स्थितीचा सामना करण्यासाठी केलेल्या तयारीचाही त्यांनी आढावा घेतला. या बैठकीत विविध मुद्द्यावर चर्चा झाली. संरक्षण यंत्रणा मजबूत करणं, अफवांना रोखणं आणि पायाभूत सुविधांची सुरक्षा सुनिश्चित करणं या मुद्यांचा यात समावेश आहे.

<><><><><>

महाराष्ट्र राज्याचं आर्थिक आरोग्य अतिशय उत्तम असून त्याची वित्तीय तूटही कमी असल्याची माहिती सोळाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरविंद पनगढिया यांनी वार्ताहर परिषदेत दिली. पनगढिया यांनी आज मुंबईत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची भेट घेतली. त्यानंतर ते बोलत होते. मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासासाठी वाढीव निधीची मागणी राज्याने केली असून या क्षेत्रातल्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी पन्नास हजार कोटी रुपयांचं विशेष वाटप करण्याची विनंतीही राज्य सरकारने आयोगाकडे केल्याचं पनगढिया यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

तेलंगणात मुलुगु जिल्ह्यात आज सकाळी माओवाद्यांनी घडवून आणलेल्या भूसुरुंग स्फोटात ग्रेहाऊंड पोलीस दलाचे तीन जवान मृत्युमुखी पडले. मुलुगु जिल्ह्यात वाझीडू पेरूरू वनक्षेत्रात नियमित सराव सुरू असताना हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तेलंगणा-छत्तीसगढ सीमेवर कर्रेगुट्टा भागात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत काही माओवादी ठार झाल्याचीही माहिती मिळत आहे.

<><><><><>

रायगड जिल्ह्यात तळा - मांदाड रस्त्यावर आज सकाळी एक वेगवान वाहन एस टी बसला धडकल्यानं चार जणांचा मृत्यू झाला तर २० जण जखमी झाले. जखमींना तातडीनं माणगाव इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यापैकी ९ जणांची प्रकृती गंभीर असल्याचं वृत्त आहे.

<><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आज देशातले सर्व ओटीटी प्लॅटफॉर्म, मीडिया स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म यांच्यासाठी अधिकृत सूचना जारी केल्या आहेत. राष्ट्रीय सुरक्षा जपण्याच्या दृष्टीनं या प्लॅटफॉर्म्सवर कोणत्याही प्रकारची पाकिस्तानी आशय सामुग्री प्रसारित केली जाऊ नये, असं प्रसारण तात्काळ बंद करावं, असे निर्देश दिले आहेत. यात वेब सीरिज, चित्रपट, गाणी, पॉडकास्ट यांचा समावेश आहे.

<><><><>

२००८ च्या मालेगाव बॉम्ब स्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेचं विशेष न्यायालय ३१ जुलै रोजी निकाल देण्यात येणार आहे. १९ एप्रिलला सुनावणी झाल्यानंतर न्यायालयानं हा निकाल राखून ठेवला होता. या प्रकरणाची सुनावणी एप्रिलमधेच पूर्ण झाली आहे, मात्र अंतिम निकाल देण्याआधी सर्व कागदपत्रं तपासणं गरजेचं असल्याचं न्यायालयानं सांगितलं.

<><><><>

मुंबईत बेस्ट उपक्रमावरचं आर्थिक संकट दूर करण्यासाठी बेस्ट बसच्या किमान प्रवासभाड्यात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय उद्यापासून लागू होणार आहे. साध्या बसकरता पहिल्या पाच किलोमीटरसाठी १० रुपये, तर वातानुकूलित बसकरता पहिल्या पाच किलोमीटर साठी १२ रुपये प्रवाशांना मोजावे लागणार आहे. १० किलोमीटरसाठी १० ऐवजी १५ रुपये, १५ किलोमीटरसाठी १५ ऐवजी २० रुपये, २० किलोमीटरसाठी २० ऐवजी ३०, २५ किलोमीटरसाठी २० ऐवजी ३५, तर पुढं प्रत्येक ५ किलोमीटरसाठी ५ रुपये वाढीव प्रवासभाडं द्यावं लागणार आहे.

**<><><><><>**

मुंबईसह राज्याच्या विविध भागात गेल्या दोन दिवसांपासून तुरळक ठिकाणी पाऊस पडला असून आजही काही भागात पर्जन्यवृष्टी सुुरु आहे. राज्याच्या चारही विभागांमध्ये आठवडाभर तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट, आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. धर्मशाला इथं संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होणार होता, मात्र पावसामुळे खेळपट्टी ओली असल्यानं तो अद्याप सुरु होऊ शकलेला नाही.

**//<><><><><>//**